# निशाणी क्र. ६१ वरील आदेश

वादीचे वारसांनी प्रस्तुतचा अर्ज वादीचे वारस अभिलेखावर दाखल करणेसाठी केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तूत कामी वादी बाळकृष्ण गंगाराम राणे हे दि. ०५/१२/२०२१ रोजी सौंदाळे, ता.देवगड येथे मयत झाले आहेत. मयत वादी यास खालीलप्रमाणे वारस असून अन्य वारस नाहीत. तरी, सदर वादी यांचे खालीलप्रमाणे वारस आहेत.

वादी – बाळकृष्ण गंगाराम राणे – मयत वारस

अ) आनंदी बाळकृष्ण राणे,
वय – ७४ वर्षे, धंदा – गृहिणी,

ब) गोपीनाथ बाळकृष्ण राणे,
वय – ५२ वर्षे, धंदा – शेती,

क) महेंद्र बाळकृष्ण राणे,
वय – ४६ वर्षे, धंदा – शेती,
तीनही राह. – मु.पो. सौंदाळे राणेवाडी,
ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग.

ड) नंदा बाळकृष्ण राणे उर्फ सविता सत्यवान अपराज,
वय – ४८ वर्षे, व्यवसाय – गृहिणी,
रा. – शिवदर्शन पथ ५, निवारी निवास, नरदास नगर, टेंबीपाडा,
भांडूप पश्चिम, मुंबई.

इ) मनिषा बाळकृष्ण राणे उर्फ उर्मिला उमाकांत कदम,
वय – ५० वर्षे, व्यवसाय – गृहिणी,
रा. – ३०१, तिसरा मजला, प्रमिला सृष्टी, ए.पी.टी.भटाई,
भारत बेकरी जवळ, ता.राजापूर, जि.रत्नागिरी.

सबब वर नमूद केलेप्रमाणे सदर वादी यांना कायदेशीर वारस आहेत. तरी सदर वारसांना दाव्यात सामील करुन मिळणेस व त्याप्रमाणे दाव्याचे कामी तशी दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती प्रस्तूत वादीने केली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, अर्जात दिलेले कारण योग्य व संयुक्तिक नाही. सबब, अर्ज जास्तीत जास्त रक्कमेसह नामंजूर करणेत यावा अशी विनंती प्रस्तूत प्रतिवादी यांनी केली आहे.

३. वादी व प्रतिवादी यांच्यातर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ३ नुसार वादी, प्रतिवादी मयत झालेस त्याच्या वारसांना दाव्यात समाविष्ट करून घेणेची तरतूद आहे. प्रस्तूत वादी हे मयत झाले आहेत, याबाबत वाद दिसून येत नाही. वादी यांनी सदरचा दावा हक्कठराव व निरंतर ताकिदीकरीता दाखल केला आहे. सदर दाव्याचे कामी सदरची दुरूस्ती महत्वाची आहे. सदर दाव्यास प्रस्तूत वादीचे वारस हे आवश्यक पक्षकार आहेत. सबब त्याप्रमाणे

दाव्यात दुरूस्ती करणेस परवानगी देणे उचित वाटते. त्यामुळे सदर अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. सबब खालील आदेश पारीत करीत आहे:

**– आदेश –**

१. प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तूत वादी यांचे वारस दाव्यात समाविष्ट केल्यानंतर वादीचे वारसांनी दाव्यात दुरूस्ती करून दाव्याची दुरूस्ती प्रत दाखल करणेची आहे.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : देवगड
दिनांक: ०९/०३/२०२२

( बी.आर.पाटील )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

Digitally signed by BALKRISHNA RAJARAM PATIL
Date: 2022.03.10 15:40:26 +0530